पुण्य नगरी

बुधवार, १ मे २०२४

# डॉ. साळुंखे यांनी सुसंस्कारी विद्यार्थी घडवले : प्राचार्य कुंभार

**कोल्हापूर :** सेवाभाव माणसाला घडवत असतो. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी संस्था स्थापनेच्या माध्यमातून सुसंस्कारी व ज्ञानी विद्यार्थी घडवले. बापूजींच्या संस्कारपूर्ण आचार-विचारातून प्रा. डी. बी. पुजारी यांच्यासारखे शिक्षक तयार झाले, असे प्रतिपादन विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी केले. ते प्रा. पुजारी यांच्या सेवानिवृत्ती सदिच्छा समारंभाच्या अध्यक्षीय मनोगतात बोलत होते.

यावेळी प्रा. पुजारी यांचा प्राचार्य डॉ. कुंभार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना प्रा. पुजारी यांनी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे व संस्थेप्रती ऋणभाव व्यक्त केला. यावेळी प्रा. एम. ए. कुरणे, प्रा. के.जे. शिंदे, प्रा. अशोक पाटील आदींनी मनोगते व्यक्त केली. मानपत्राचे वाचन प्रा. गीतांजली साळुंखे यांनी केले. प्रास्ताविक प्रा. शिल्पा भोसले यांनी केले. आभार प्रा. यू. आर. हिरकुडे यांनी मानले.

02/05/2024

3/5/24